S.N.D.T. Women's University
1, Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Website : sndt.ac.in

A- Grade (CGPA 3.08)

ॲफी.जन.१/परिपत्रक/२०२५-२६/2255 दिनांक : १६/०१/२०२६

# सूचना पत्र

**महाविद्यालयाचे प्राचार्य / प्रभारी प्राचार्य यांचा तात्काळ कार्यवाहीस्तव**

विषय: महाविद्यालयाचे प्राचार्य / प्रभारी प्राचार्य यांच्या अवलोकनार्थ व तात्काळ आवश्यक कार्यवाहीकरिता.

संदर्भ: परिपत्रक क्र. Ref.No. Affi-Gen/Format/2025-26/2142 दिनांक : 19/12/2025.

परिपत्रक क्र. ॲफी.जन.१/परिपत्रक/२०२५-२६/२२१६ दिनांक : 06/01/2026.

प्रत्येक शैक्षणिक वर्षामध्ये ॲफिलिएशन (Affiliation) ऑनलाईन पोर्टल वरील महाविद्यालयांची माहिती अद्यावत करणे अनिवार्य करण्यात आलेले आहे. त्यानुसार डिसेंबर 2025 मध्ये सर्व संलग्न महाविद्यालयांचे कॉलेज लॉगिन सुधारित माहिती नोंदविण्यासाठी उपलब्ध करून देण्यात आले होते. सर्व महाविद्यालयांनी दिनांक 31 डिसेंबर 2025 पर्यंत पोर्टलवरील माहिती अद्यावत करणे आवश्यक होते.

मात्र, आज रोजी घेतलेल्या आढाव्यानुसार एकूण ३९० महाविद्यालयांपैकी केवळ ११३ महाविद्यालयांनीच पोर्टलवरील माहिती अद्यावत केलेली असून उर्वरित महाविद्यालयांनी अद्याप आवश्यक कार्यवाही पूर्ण केलेली नाही, असे निदर्शनास आले आहे.

महाविद्यालयांची माहिती पोर्टलवर अद्यावत करणे अनिवार्य असून, यामुळे स्थानिक चौकशी (LIC) भेटीदरम्यान तसेच "AAA" ऑडिटच्या भेटीदरम्यान महाविद्यालयाचा अद्यावत डेटा तपासणीसाठी समितींना उपलब्ध होतो. महाविद्यालयाने कॉलेजची माहिती पोर्टलवर अद्यावत न केल्यास तपासणीच्या वेळी माहितीमध्ये विसंगती आढळून येते. अशा विसंगतींची नोंद तपासणी अहवालामध्ये झाल्यास संबंधित महाविद्यालयास अनावश्यक प्रशासकीय व शैक्षणिक अडचणींना सामोरे जावे लागते. या सर्व बाबींवर पोर्टलवरील महाविद्यालयाची माहिती वेळेवर व अचूक अद्यावत करणे हाच एकमेव प्रभावी उपाय असून, महाविद्यालय प्रशासनाने या परिपत्रकाची गांभीर्याने नोंद घेऊन विहित कालावधीत माहिती अद्यावत करणे अनिवार्य आहे.

Cont…

...: Women's University
..., Nathibai Thackersey Road,
New Marine Lines, Churchgate,
MUMBAI - 400 020.
Phone : + 91 22 2203 1879

श्रीमती ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ
१, नाथीबाई ठाकरसी मार्ग, न्यु मरिन लाईन,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
Website : sndt.ac.in

A- Grade (CGPA 3.08)



म्हणून, एक संधी म्हणून संबंधित ऑनलाईन पोर्टलची मुदत दिनांक २७ जानेवारी २०२६ पर्यंत वाढविण्यात येत आहे. तथापि, या वाढीव कालावधीतदेखील ज्या महाविद्यालयांनी पोर्टलवरील माहिती अद्यावत केलेली नसेल, त्या महाविद्यालयांवर आर्थिक दंड आकारण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

तसेच, संबंधित महाविद्यालयांची शैक्षणिक वर्ष **२०२६-२७** करिता होणारी स्थानिक चौकशी (LIC) भेट तसेच "AAA" ऑडिटची, भेट प्रलंबित ठेवण्यात येईल, याची स्पष्ट नोंद घ्यावी. यामुळे होणाऱ्या कोणत्याही पुढील शैक्षणिक अथवा प्रशासकीय नुकसानीस संबंधित महाविद्यालयाचे प्रशासन पूर्णतः जबाबदार राहील.

तरी सर्व संबंधित प्राचार्य / प्रभारी प्राचार्य यांनी या बाबीकडे अत्यंत गांभीर्याने लक्ष देऊन तात्काळ आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात येत आहेत.

ऑनलाईन पोर्टलवरील माहिती अद्यावत करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अथवा इतर अडचणी उद्भवत असल्यास संबंधित महाविद्यालयांनी कार्यालयीन वेळेत खाली नमूद केलेल्या संपर्क क्रमांकावर संपर्क साधावा, असे निर्देश देण्यात येत आहेत.

हेल्पलाईन क्र. 08828996661, 08828996662.

आपला विश्वासू,

(डॉ. हिम्मत जाधव)
अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा
संलग्नता विभाग (अतिरीक्त भार)

प्रत : समन्वयक, निर्मल सॉफ्टवेअर सर्व्हिसेस प्रा. लि. मुंबई - यांनी या विषयी आवश्यक ती कार्यवाही व सूचना दयाव्यात.